# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाला सादर करण्यासाठी प्रस्तुत प्रबंधाविषयीचा अभ्यास करताना अनेकांनी अनेकपरीने विविध स्वरूपाची मदत केली. अनेकांचे प्रोत्साहन व सहकार्य लाभले त्यांचा ऋणनिर्देश करणे मी माझे आद्यकर्तव्य समजते.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी तसेच आजी विभागप्रमुख सन्माननीय डॉ. रवींद्र ठाकूर आणि डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले, या सर्वांचे प्रोत्साहन लाभले. त्यांची मी ऋणी आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या विषय निवडीपासून प्रबंधाच्या पूर्ततेपर्यंत वेळोवेळी सूचना देऊन मौलिक मार्गदर्शन करणा-या आदरणीय मार्गदर्शिका डॉ. रोहिणी तुकदेव यांचे हे ऋण शब्दात व्यक्त न करता येण्याजोगेच आहे.

नेहमीच अडचणीच्यावेळी अंतरिक जिव्हाळ्याने मदतीचा हात देणारे माझे आदरणीय गुरूवर्य डॉ. मोहन पाटील आणि प्रा.सुहास कुलकर्णी यांचे ऋण फारच मोलाचे आहेत.

खडतर जीवनाशी सामना देत असताना सुध्दा माझ्या विषयीचे एक वेगळे स्वप्न ज्यानी उराशी बाळगले होते ते माझे वडील कै.वासुदेव देशिंगकर यांच्या आशीर्वादाने हे स्वप्न या लघुप्रबंधाच्याव्दारे मी साकार करू शकले. तसेच माझी आई, बंधू आणि बहीण, माझे प्रबधंलेखनाचे काम सुरु असताना माझी कन्या चि. आर्यास अत्यंत काळजीपूर्वकतेने जपणा-या माझ्या सासूबाई व माझा पुतण्या चि. नरेंद्र, प्रबंधलेखन पूर्ततेची सतत विचारपूस करणारे माझे सासरे, दीर, जाऊबाई,

व माझे पती ॲड. विद्याधर सरदेसाई. यांच्यामुळे मी माझे लघुप्रबंधाचे काम पूर्ण करू शकले या सर्वांचे ऋण शब्दात व्यक्त न करता येण्यासारखे आहे.

या प्रबंध लेखनासाठी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. विलिंग्डन महाविद्यालय, सांगली. श्री गं.खि.घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर. राजर्षि शाहू नगर वाचन मंदीर, शिरोळ. या ग्रंथालयाचे मोलाचे सहाय्य लाभले.

या प्रबंधाच्या पूर्ततेपर्यंत अनेक शुभचिंतकांनी व स्नेही मंडळींनी मदतीचा हात पुढे केला. त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते. विशेषत: श्री विजय कुलकर्णी , श्री गुरुप्रसाद चौगुले , विनोद चव्हाण, श्री.लक्ष्मी नारायण ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्था, नृसिंहवाडी. यांनी संगणकावर टंकलेखन करून दिले व चांगल्याप्रकारे मुद्रण करून दिले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानते.

- कु. विभावरी वासुदेव देशिंगकर.

# प्रास्ताविक

अनुराधा पाटील यांच्या कवितांचा चिकित्सक अभ्यास 'दिगंत', '...तरीही' व 'दिवसेंदिवस' या तीन कवितासंग्रहाच्या आधारे करणे हा प्रस्तुत लघुप्रबंधाचा उद्‌देश आहे.

आधुनिक काळातील कवितेत स्त्रियांचे योगदान महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील प्रमुख कवयित्री म्हणून 'अनुराधा पाटील यांचे स्थान महत्वाचे आहे. अनुराधा पाटील यांच्या काव्याचे परीक्षण अनेक मान्यवरांनी केले आहे परंतु त्यांच्या 'दिगंत', 'तरीही' व 'दिवसेंदिवस' या तीन कवितासंग्रहातील कवितांचा चिकित्सक अभ्यास झालेला नाही म्हणून अनुराधा पाटील यांच्या 'दिगंत' 'तरीही' व दिवसेंदिवस या कवितासंग्रहातील कवितांचा स्त्रीवादी दृष्टिकोणातून अभ्यास करण्याचे इथे योजिले आहे.